| | | |
|---|---|---|
| आरोग्य सेवा संचालनालय,<br>( महाराष्ट्र राज्य )<br>' आरोग्य भवन ' सेंट जार्जेस रुग्णालय, आवार पी. डिमेला रोड, मुंबई - ४००००१ | | |
| कार्यालय<br>संचालक<br>सहसंचालक (अर्थव प्रशासन )<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी<br>प्रशासकीय अधिकारी | दूरध्वनी ०२२<br>२२६२१०३१ - ३६<br>२२६२११८६<br>२२६२१९७३<br>२२६२६२०४ | Website : http:// arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : miscell@rediffmail.com<br>Email : aodesk2adhs@gmail.com |
| **कालमर्यादा.**<br>**दि.१२.०२.२०१९ सायं.५.३०** | क्रसंआसे/मवैआसे/२अ/टे-३/वै.अ. गट-अ पदभरती/पात्र/अपात्र यादी /३२७ /१९<br>दिनांक- ०८ फेब्रुवारी २०१९ | |

# वैद्यकीय अधिकारी , गट-अ पात्र/अपात्र उमेदवारांची सामायिक यादी बाबत सुचना

महाराष्ट्र राज्यातील आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ ( वेतन बॅण्ड रुपये १५६०० - ३९१०० ग्रेड पे ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ यांची यापुर्वी दिलेली ७२३ पदांची जाहिरात व दि.२७.१२.२०१८ रोजी प्रकाशित केलेली ८७७ पदांसाठीची राज्य स्तरावरुन पदभरतीची जाहिरात प्रकाशित करण्यात आलेली होती.

सदर दोनही जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जाची सामायिक प्राथमिक छाननी व डाट्रा एन्ट्रीचे कामकाज केले असता, २०५ अर्जदारांचे अर्ज (एमबीबीएस शैक्षणिक अर्हता नसलेले, धनाकर्ष नसलेले, वयाधिक्य झालेले , सेवेत कार्यरत व अनधिकृत गैरहजर असलेले इ. कारणास्तव) अपात्र असल्याचे दिसून आले आहे.सदरहू अपात्र उमेदवारांची तात्पुरती (Provisional List) स्वतंत्र यादी संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येत आहे.

तसेच प्रथमदर्शनी पात्र असलेल्या ३०६२ उमेदवारांची तात्पुरती (Provisional List) सामायिक यादी सोबत जोडलेली असून ती याव्दारे संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येत आहे. यामध्ये सर्व कागदपत्रे जोडलेले तसेच ज्या उमेदवारांची सदर अर्जासोबत गुणपत्रिका, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांचेकडे नोंदणी न केलेले व तसेच अंतिम वर्षाची गुणपत्रीका जोडलेली नसलेले, नॉनक्रिमियर प्रमाणपत्र न जोडलेले, इतर त्रुटी असलेले उमेदवार यांचीही नावे यादीत दर्शविण्यात आलेली आहेत.

तसेच उपरोक्त सर्व ३२६७ उमेदवारांच्या अर्जाची छाननी केली असता काही उमेदवारांनी २ ते ३ वेळेस पुन्हा अर्ज केला असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा दुहेरी किंवा त्यापेक्षा जास्त अर्ज सादर करणा-या उमेदवारांबाबत, एकाच परीपूर्ण अर्जाचा विचार करण्यात येईल. तसेच ज्या उमेदवारांनी निव्वळ एम.बी.बी.एस.पात्रता नमूद करुन एक अर्ज दाखल केला आहे व दुस-या अर्जात पदव्युत्तर पदविका/पदवीचा उल्लेख केलेला आहे, अशावेळी पदव्युत्तर पदवी/पदविका नमूद केलेल्या अर्जाचा

विचार करण्यात येईल व अन्य अर्ज विचारात घेता येणार नाही , तसेच ते अर्ज अपात्र ठरविण्यात येतील, यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदरहू दोनही पात्र व अपात्र यादीबाबत उमेदवारांचे काही आक्षेप वा हरकती असल्यास त्यांनी आरोग्य सेवा संचालनालयाच्या dhs2adesk@gmail.com या ईमेल आयडीवर किंवा आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथील ५ व्या माळयावरील कार्यासन २-अ येथे प्रत्यक्ष सादर कराव्यात. सोबत पुष्ठर्थ्य आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती जोडणे अनिवार्य राहिल. सदर आक्षेप/ हरकती या दि. १२/०२/२०१९ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत प्रत्यक्ष अथवा ई मेलवर सादर करावयात. कृपया सदरहू आक्षेप/हरकती या पोष्टाव्दारे /कुरिअर सेवामार्फत पाठविण्यात येऊ नयेत. उपरोक्त नमुद दिनांक व वेळेनंतर कोणत्याही उमेदवारांच्या हरकती/आक्षेप स्विकारले जाणार नाहीत, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण-मुंबई.
दिनांकः-०८ फेब्रुवारी २०१९.

(मा.आयुक्त ,आरोग्य सेवा, मुंबई यांच्या मान्यतेने)

8/2/2019

( शैलेश रा.पाटणकर )
मुख्य प्रशासकीय अधिकारी
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

Desktop letter2019-343